महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.org.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road, Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.org.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक: कशिमं/शारेप-२०२४/ 265 दि.२८.०८.२०२४

प्रति,
मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख,
शासकीय रेखाकला परीक्षा — २०२४

विषय :- शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट डॉईंग ग्रेड) परीक्षा २०२४
दिनांक ३१.८.२०२४ पर्यंत विद्यार्थ्यांची ऑनलाईन नांव नोंदणी करुन परीक्षा शुल्क भरणा करणे तसेच परीक्षक, समालोचक व उपमुख्य समालोचक यांची ऑनलाईन नांव नोंदणीबाबत ...

संदर्भ- १) परिपत्रक क्र. कशिमं/शारेप-२०२४/५७, दिनांक १६.०७.२०२४
२) परिपत्रक क्र. कशिमं/शारेप-२०२४/२३४, दिनांक १४.०८.२०२४

शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट डॉईंग ग्रेड) परीक्षा २०२४ चे वेळापत्रक तसेच केंद्राची नोंदणी/केंद्राची माहिती अद्ययावत करणे/केंद्राच्या अधिनस्त असलेल्या सहभागी शाळांची नोंदणी/परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची सर्वसाधारण नोंदवहीतील (GENERAL REGISTER) नावाप्रमाणे अचूक नांवनोंदणी/परीक्षक, समालोचक व उपमुख्य समालोचक नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबतचा कालावधी वरील विशायाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या संदर्भीय क्र.१ वरील पत्रानुसार कळविण्यांत आला आहे. तथापी परीक्षक, समालोचक व उपमुख्य समालोचक ऑनलाईन नोंदणीबाबत अपेक्षित प्रतिसाद दिसून येत नाही.

सदर परीक्षांसाठी विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग विचारात घेता विहित कालमर्यादेत उत्तरपत्रिकांचे मुल्यमापनाकरिता प्रशिक्षित व अनुभवी कलाशिक्षकांची मोठया प्रमाणपणावर आवश्यकता असते. काही अनुदानित शाळेतील कलाशिक्षकांनी त्यांच्या कर्तव्यकालावधीत एकदाही उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन केले नसल्याचे निदर्शनास येत आहे. आपल्या शाळेत/सहभागी शाळेतील प्रामुख्याने अनुदानित शाळेत कार्यरत असलेले सर्व कलाशिक्षक यांनी तसेच विनाअनुदानित शाळेत कार्यरत असलेल्या कला शिक्षकांनी मुलयमापनाकरिता ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणे आवश्यक आहे.

आपल्या केंद्र शाळेतील/सहभागी शाळेतील ज्या कला शिक्षकांनी परीक्षक,समालोचक व उपमुख्यसमालोचक म्हणून कामकाजाकरिता ऑनलाईन पध्दतीने अद्याप नोंदणी केली नाही त्यांना विहित कालावधीत नोंदणी करण्यांबाबत आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे. मुल्यमापनासाठी नियक्त केलेल्या कला शिक्षक यांना मुल्यमापनाच्या कामकाजाच्या वेळी कार्यमुक्त करावे.

परीक्षेसाठी प्रवष्ठि होऊ इच्छिणा-या ज्या विद्यार्थ्यांची अद्याप ऑनलाईन नांवनोंदणी केली नाही त्यांची ऑनलाईन नांवनोदणी तात्काळ करावी व संदर्भिय क्र.२ वरील परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे दिनांक ३१.८.२०२४ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही करण्यांत येईल.

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत:- महिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.
१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
५) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
६) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई.

........ २

७) शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी सर्व महानगरपालिका

८) प्राचार्य, संगीत आणि कला अकादमी, कला विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, शिक्षण विभाग, मुंबई.

९) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.

१०) उपसचिव (कला), महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, नागपूर/छत्रपती संभाजीनगर.

११) जिल्हा विद्यालय निरीक्षक, (सर्व) उत्तरप्रदेश / मध्यप्रदेश / उत्तराखंड / छत्तीसगढ/गोवा.

१२) निवड नस्ती